लोकमत

# स्मार्ट इंडिया हॅकथॉन-२०२४ स्पर्धेत के. के. वाघ प्रथम; तिसऱ्यांदा अव्वल

## भारत सरकारतर्फे स्पर्धा : सॉफ्टवेअर-हार्डवेअर प्रकारात साधले यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन-२०२४ स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर या दोन्ही प्रकारांत देशात प्रथम क्रमांक पटकावला. यावेळी तीन संघांना एकूण तीन लाख रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेत विजय मिळवत महाविद्यालयाने विजयासह बक्षिसांची हॅट्ट्रिक केली.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी श्रीनगर येथील नोडल सेंटर येथे झालेल्या स्पर्धेत तृतीय वर्ष कॉम्प्युटर विभागात शिकत असलेले हरीष लुकारे, प्रीती राठी, सायली उगलमुगले, किशन माळी, तन्मय तांबट, प्रद्युम्न पाटील यांनी मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस अँड एम्पॉवरमेंट यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंटवर प्रकल्प सादर केला. प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले.




- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तिरुपती येथील नोडल सेंटर येथे झालेल्या हॅकॅथॉन स्पर्धेत सॉफ्टवेर प्रकारात पर्णिका पाटील, हर्षल पाटील, पंकज मराठे, प्रतीक चंद्रात्रे, आदित्य देवळालीकर, अथर्व गाडेकर यांनी मिनिस्ट्री ऑफ आयुष यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला.
- द्वितीय, तृतीय वर्ष कॉम्पुटर सायन्स आणि डिझाइन व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभियांत्रिकीमध्ये शिकत असलेल्या या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रुर्की येथे झालेल्या हॅकॅथॉन स्पर्धेत हार्डवेअर प्रकारात ओसिनिया क्षेत्रिमयूम, अक्षदा खैरनार, मेघराज भावसार, श्रेय साळुंखे, ईशान जावळे, प्रणव प्रजापती या गव्हर्नमेंट ऑफ हिमाचल प्रदेश यांनी दिलेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर प्रकल्प सादर केला. द्वितीय, तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभियांत्रिकीमध्ये शिकत असलेल्या या टीमने उत्तम सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकाविला. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. एस. एम. कमलापूर, प्रा. डॉ. आर. के. मुंजे आदींनी त्यांचा सन्मान केला.